# फील्ड गाइड

## समुद्री पक्ष्यांची काळजी

## आणि ने-आण



ReefWatch
Marine Conservation

reefwatchindia.com 6360249764 projectcoordinator.tele@reefwatchindia.org

# भागीदार

REEFWATCH
MARINE CONSERVATION

ROHINI
NILEKANI
*philanthropies*

# अनुक्रमणिका


| पान क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | समुद्री पक्षी म्हणजे काय? |
| २ | समुद्री पक्षी कसे ओळखायचे? |
| ३ | आपल्याला दिसणारे समुद्री पक्षी |
| ५ | तक्रार करणं |
| ७ | उपकरणे |
| ८ | समुद्री पक्षी पकडणे |
| ९ | समुद्री पक्ष्यांची हाताळणी |
| १० | वाहतूक |
| ११ | मृत पक्ष्याची तक्रार करणे |
| १२. | या चुका होऊ नयेत याची काळजी घ्या |
| १३ | महत्वाचे संपर्क |

# समुद्री पक्षी म्हणजे काय?

समुद्री पक्षी आपला जास्त वेळ समुद्राच्या जवळ किंवा समुद्रावर उडण्यात घालवतात.

समुद्री पक्षी पूर्णपणे समुद्रावर अवलंबून जगतात. ते नेहमी समुद्रातच राहतात, त्यामुळे त्यांना माणसांशी सवय नसते.

गोव्यात साधारण 20 प्रकारचे समुद्री पक्षी दिसतात. त्यांचं शरीर आणि सवयी अशा असतात की ते समुद्राच्या कठीण परिस्थितीतसुद्धा आरामात जगू शकतात.



# टिप्पणी

## महत्त्वाचे संपर्क

**रीफवॉच बंगळुरू:** 6360249764

**वन विभाग:**

**24x7 हेल्पलाइन:**



## समुद्री पक्षी कसे ओळखायचे?


समुद्री पक्षी ओळखण्यासाठी लक्षात ठेवा:




समुद्री पक्ष्यांच्या पायांना जाळी असते, म्हणून ते पाण्यात नीट पोहू शकतात.



समुद्री पक्ष्यांची चोच लांब असते, म्हणून ते सहज मासे पकडतात.





समुद्री पक्ष्यांचे पंख लांबट असतात, म्हणून ते खूप दूरपर्यंत उडू शकतात.

# तुम्हाला दिसणारे समुद्री पक्षी




हे पक्षी थंडीच्या आणि उन्हाळ्याच्या मोसमात जास्त दिसतात. समुद्री पक्षी बहुतेक वेळा समुद्रकिनारीच दिसतात.



# ही चूक करू नका



**डोकं उघडं ठेवू नका –** पक्ष्याचं डोकं कपड्यानं झाका, म्हणजे तो घाबरणार नाही

**कंटेनर (डबा/पिंजरा) शिवाय पक्षी दुसऱ्या ठिकाणी नेऊ नका** हातात धरून नेऊ नका, नेहमी बॉक्स किंवा कॅरिअर वापरा.





**पक्षी उघड्यावर सोडणे –** पक्षी उघड्यावर सोडू नका, त्यांना डब्यात सुरक्षित ठेवा

## जर तुम्हाला एखादा मृत समुद्री पक्षी सापडला तर –

- घटनेची माहिती लगेच गटाला द्या
- पक्षी मृत मिळाला तर, त्याला उचलून घ्या किंवा जमिनीत पुरा
- संसर्ग टाळण्यासाठी डिस्पोजेबल मास्क आणि हातमोजे वापरा.
- पक्षी हवाबंद पॉलिथिन पिशवीत ठेवा आणि सुरक्षित ठेवा, जोपर्यंत तो वन विभाग किंवा रीफवॉच यांना दिला जात नाही




गोव्यात पहिल्यांदा वेज-टेल्ड शियरवॉटर दिसला, तोही मृत अवस्थेत किनाऱ्यावर सापडला



## तुम्हाला दिसणारे समुद्री पक्षी

हे पक्षी बहुतेकदा पावसाळ्यात दिसतात. हे उघड्या व खोल समुद्रात आढळतात आणि त्यांना पेलॅजिक समुद्री पक्षी म्हणतात.



# कळवणे

कधी करायचं?

- पक्षी लांबून बघा आणि लक्ष द्या

**पक्ष्याला इजा झाली आहे का?**





**तो उडू शकत नाही का?**

**किंवा तो जाळ्यात/ दोऱ्यात अडकला 5आहे का?**



# वाहतूक

- पक्षी नेताना हवेशीर पिंजरा किंवा वर छोटे छिद्र असलेला कागदी डबा वापरा, म्हणजे त्यात हवा ये-जा करू शकेल.
- पक्ष्याला जास्त हात लावू नका. पिंजरा झाकून तो शांत जागी ठेवा, म्हणजे पक्षी घाबरणार नाही. कारण पक्षी आवाज आणि हालचालीला पटकन घाबरतात
- पावसाळा आणि हिवाळ्यात पिंजरा उबदार जागी (24°C–30°C) ठेवा, म्हणजे पक्ष्याला थंडी वाजणार नाही
- पक्षी नेताना धक्का लागू देऊ नका, म्हणजे तो घाबरणार नाही आणि सुरक्षित राहील



# समुद्री पक्ष्यांना हाताळणे

लहान समुद्री पक्षी उचलताना:

- एका हाताने त्याचे पंखाचे टोक, पाय आणि पोट हलके पण घट्ट पकडा.
- दुसऱ्या हाताने: पंख अलगदपणे टॉवेल/कापडाने झाका.

मोठे समुद्री पक्षी उचलताना:

- एका हाताने पक्ष्याच्या छातीखाली आधार द्या आणि त्याचं वजन सांभाळा.
- दुसऱ्या हाताने पंखाचे टोक आणि पाय हलके पण घट्ट पकडा.

जास्त चांगलं म्हणजे दुसऱ्या व्यक्तीने पक्ष्याच्या डोक्यावर टॉवेल ठेवावा, म्हणजे तो शांत राहील.





# कळवणे

## कसं करावं?

- तुमच्या स्थानिक वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करा आणि घटनेची माहिती द्या.
- पक्ष्याला न छेडता त्याच्या जखमेचे फोटो काढा.
- फोटो जिओ-टॅग्ड असतील तर अजून चांगलं होईल.
- फोटो काढताना लक्ष द्या की पूर्ण पक्षी बाजूने (साइडने) फोटोमध्ये दिसला पाहिजे.






## जखमी पक्षी उचलण्यापूर्वी आपली साधनं (उपकरणं) तपासून घ्या.



1. योग्य आकाराचा, स्वच्छ पिंजरा किंवा गत्याचा डबा



2.पक्षी आणि पिंजरा झाकण्यासाठी टॉवेल/कापड



3. सुरक्षा साधनं जसं की हातमोजे आणि मास्क



## समुद्री पक्षी पकडणे

1. पक्ष्याजवळ हळूहळू आणि शांतपणे जा. जर पक्षी खूप फडफड करत असेल किंवा घाबरलेला असेल, तर त्याला पकडण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची मदत घ्या.
2. पक्ष्यावर अलगद तौलिया टाका. त्याचा पूर्ण शरीर तौलियामध्ये गुंडाळा आणि डोकं झाकून टाका. असं केल्याने पक्ष्याची घबराट कमी होईल आणि पकडणाऱ्या व्यक्तीलाही सुरक्षितता मिळेल.
3. पक्ष्याचे पंख आणि पाय योग्य पद्धतीने धरा. यामुळे तो अनावश्यक हालचाल करणार नाही आणि इजा होण्याचा धोका कमी होईल.
4. पक्ष्याच्या चोची आणि छातीला हलकं पकडा. जास्त दाब देऊ नका, म्हणजे त्याला श्वास घेण्यात अडचण होणार नाही. नेहमी लक्ष ठेवा की पक्षी आरामात श्वास घेत आहे.